मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# “आयटी स्टडी सेल” स्थापन होणार : आमदार शंकर जगताप

## कामगार मंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीमध्ये आमदारांच्या पाठपुराव्यामुळे आयटीयन्सना दिलासा; मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत लवकरच विशेष बैठक

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंजवडी तसेच राज्यातील आयटी पार्कमधील आयटीयन्सच्या नोकरीची असुरक्षितता, ‘ले-ऑफ’च्या नावाखाली होणारी पिळवणूक आणि फ्रेशर्सची वाढती फसवणूक यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी राज्य शासनाकडून एका ‘ आयटी स्टडी सेल’ची स्थापना केली जाणार आहे. चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी या प्रश्नी घेतलेल्या पुढाकारामुळे आता आयटीयन्सचे प्रश्न थेट मुख्यमंत्री स्तरावर पोहोचले असून, लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत यासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडणार आहे.

आयटीयन्सच्या विविध गंभीर समस्यांबाबत कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या उपस्थितीत मंगळवारी (दि. २१) मंत्रालयात एक संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीत आमदार शंकर जगताप यांनी आयटीयन्सया व्यथा मांडल्या. या वेळी कामगार मंत्री फुंडकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, आयटी क्षेत्रासाठी विशेष कायदे करणे आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तज्ज्ञांचा समावेश असलेली आयटी स्टडी सेलची स्थापना करण्याचे निर्देश दिले. या महत्त्वाच्या बैठकीला कामगार मंत्री आकाश फुंडकर, प्रधान सचिव (कामगार) आय. ए. कुंदन, कामगार आयुक्त डॉ. एच. पी. तुम्मोड, अवर सचिव (कामगार-२) स्वप्निल कापडणीस, अवर सचिव (उद्योग) अजित सासुळकर, अवर सचिव (IT) योगेश गोसावी, ‘फोरम फॉर आयटी एम्प्लॉईज’चे पवनजित माने व प्रशांत पंडित, सहाय्यक कामगार आयुक्त वि. अ. नामदे आणि कक्ष अधिकारी (विधी) अश्विनी सैनी उपस्थित होते.

आमदार शंकर जगताप यावेळी म्हणाले, राज्याच्या जीडीपीमध्ये आयटी क्षेत्राचा वाटा मोठा असला, तरी येथील आयटीयन्सच्या समस्यांकडे दुर्लक्ष होत आहे. आयटी कर्मचाऱ्यांची व्याख्या अधिक स्पष्ट करणे, त्यांना औद्योगिक विवाद अधिनियमांतर्गत संरक्षण मिळवून देणे आणि कंपन्यांकडून केल्या जाणाऱ्या ले-ऑफ थांबवण्यासाठी नियमावली तयार करण्यावर या ‘स्टडी सेल’चा भर असेल. तसेच, आयटीयन्सच्या तक्रारींच्या जलद निवारणासाठी ‘आयटी ट्रिब्युनल’ स्थापन करण्याबाबतही चर्चा झाली.



### बैठकीतील महत्त्वाचे मुद्दे

**» आयटीयन्सना निवृत्तीनंतरचे वेतन आणि नोकरी गेल्यानंतरचे लाभ मिळावेत यासाठी ईपीएफओ (EPFO) च्या माध्यमातून हस्तक्षेप करण्याचा प्रस्ताव, कंपन्यांमध्ये ‘पॉश’ (POSH) समिती आणि क्रंची फॅसिलिटी सुविधांची काटेकोर तपासणी, कर्मचाऱ्यांना अचानक कामावरून काढून त्यांना ‘ब्लॅकलिस्टेड’ करण्याच्या प्रकारावर कायदेशीर निर्बंध आणण्याबाबत चर्चा करण्यात आली. मुख्य म्हणजे आयटीयन्सच्या तक्रारींचे जलद निवारण करण्यासाठी विशेष ‘आयटी ट्रिब्युनल’ किंवा फास्ट ट्रॅक लेबर कोर्ट येत्या जून अखेर सुरू होण्याबाबत कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी सांगितले.**

**“ आयटीयन्सना सध्या अनेक कायदेशीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. “औद्योगिक विवाद अधिनियमांतर्गत आयटीयन्सची व्याख्या स्पष्ट नसल्याने त्यांना योग्य कायदेशीर संरक्षण मिळत नाही. त्यामुळे त्यांना कामगार कायद्याच्या कक्षेत आणणे आवश्यक आहे,” यासाठी उद्योग, कामगार आणि माहिती-तंत्रज्ञान या तिन्ही विभागांच्या समन्वयातून मार्ग काढण्यासाठी पावले उचलली जात आहेत. “आयटी क्षेत्र हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मात्र, आयटीयन्सच्या नोकरीची सुरक्षा आणि कायदेशीर हक्कांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. यावर आता आयटी स्टडी सेल स्थापन करण्याचे आश्वासन कामगार मंत्र्यांनी दिले आहे. मुख्यमंत्री स्तरावर बैठक घेऊन लवकरच यावर ठोस कायदेशीर तरतूद केली जाईल.”**

**- शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा**

# पुणे मनपाची मनमानी; वीज प्रकल्प रखडण्याची चिन्हे

## ऊर्जा मंत्री मेघना बोर्डीकर यांच्याकडे संतोष सौंदणकर यांची मध्यस्थीची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या आरडीएसएस (RDSS) योजनेअंतर्गत शहरातील वीज वाहिन्या भूमिगत करून विद्युत पुरवठा अधिक सक्षम व सुरळीत करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पुण्यात रखडण्याची चिन्हे दिसत आहेत. खोदकाम करण्यासाठी पुणे महापालिकेकडून आवश्यक परवानगी दिली जात नाही. त्यामुळे आपण यात लक्ष घालून पुणे मनपा प्रशासनाची बैठक घेऊन परवानगी देणेबाबत त्यांना आदेशित करावे, अशी मागणी शिवसेना जिल्हा संघटक तथा पुणे सनियंत्रण समितीचे सदस्य संतोष सौंदणकर यांनी राज्याचे उर्जा मंत्री मेघना बोर्डीक र यांच्याकडे केली आहे.

सौंदणकर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पुणे महापालिका हद्दीत विद्युत वाहिन्या भूमीगत करण्याचे काम सध्या रखडले आहे. त्यासाठी आवश्यक परवानग्या उपलब्ध करण्यासाठी महावितरणकडून महापालिकेशी सातत्याने पत्रव्यवहार करण्यात आला.



तरी परवानगी देणेबाबत महापालिका स्तरावर तोडगा निघालेला नाही. हे काम पूर्ण न झाल्यास ऐन पावसाळ्यात वीजपुरवठा खंडित होण्याची शक्यता आहे. दरम्यान, पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत अशाच प्रकारची कामे सुरळीत सुरू असून तेथे आवश्यक परवानग्या मिळाल्या आहेत. मात्र, पुणे महापालिका क्षेत्रात परवानगी अभावी कामात अडथळे निर्माण होत आहेत. तसेच, महापालिकेकडून खोदकामासाठी केवळ मार्च-एप्रिल या कालावधीतच परवानगी दिली जाते, तर १ मेनंतर खोदकामास बंदी असते. पावसाळ्यात ही कामे करणे शक्य नसल्याने सध्याचा कालावधी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

या पार्श्वभूमीवर ऊर्जा मंत्र्यांनी तातडीने लक्ष घालून महापालिका प्रशासनासोबत बैठक घेऊन सकारात्मक तोडगा काढावा, तसेच संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी संतोष सौंदणकर यांनी उर्जा मंत्री मेघना बोर्डीकर यांच्याकडे केली आहे.

# नाल्यांद्वारे नदीत सांडपाणी सोडणाऱ्यांवर कडक कारवाई करा : महापौर रवि लांडगे

## किवळे परिसरात महापौरांची प्रत्यक्ष पाहणी; एसटीपी सक्ती, दंडात्मक कारवाई आणि जबाबदारी निश्चित करण्याचे निर्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

किवळे परिसरातील सिम्बॉयसिस कॉलेज व आसपासच्या गृहनिर्माण सोसायट्यांमधून नाल्यांद्वारे थेट पवना नदीत सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्याबाबत महापौर रवि लांडगे यांनी आज प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ आणि कडक कारवाईचे निर्देश दिले

यावेळी नगरसदस्य धर्मपाल तंतरपाळे, माजी नगरसदस्य तुकाराम भोंडवे, कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट, उपअभियंता दीपक करपे, कनिष्ठ अभियंता प्रसाद संकपाळ तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौरांनी पाहणीदरम्यान स्पष्ट शब्दांत सांगितले की,

महापौर रवि लांडगे यांनी स्पष्ट केले की, ही कारवाई केवळ किवळे किंवा पवना नदीपुरती मर्यादित न राहता संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरात राबविण्यात येणार आहे. इंद्रायणी, मुळा आणि पवना या तिन्ही नद्यांमध्ये नाल्यांद्वारे सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्याविरुद्ध एकत्रित मोहीम हाती घेण्यात येणार असून, सर्व संबंधित विभागांना याबाबत समन्वयाने काम करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. "नाल्यांद्वारे थेट सांडपाणी नदीत सोडणे हा गंभीर पर्यावरणीय गुन्हा असून, अशा प्रकरणांमध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नाही."





### पर्यावरण संरक्षणासाठी समन्वय

» महापौरांनी पर्यावरण विभागासोबत सविस्तर चर्चा करत सांडपाणी थेट नदीत जाणार नाही यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले. यामध्ये नाल्यांचे इंटरसेप्शन, डायव्हर्शन व एसटीपीकडे वळविणे यावर भर देण्यात आला. 'सांडपाणी मुक्त नदी' या अभियानाचा उल्लेख करत महापौरांनी सांगितले की,ही मोहीम केवळ प्रशासनाची नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. प्रदूषण रोखण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घेऊन माहिती द्यावी. प्रशासन आणि नागरिकांच्या संयुक्त प्रयत्नातूनच शहरातील नद्या खऱ्या अर्थाने स्वच्छ व प्रदूषणमुक्त होतील. पिंपरी-चिंचवडमधील इंद्रायणी, मुळा व पवना या नद्यांचे प्रदूषण रोखणे ही सर्वोच्च प्राधान्याची बाब असून, यापुढे कोणत्याही प्रकारची बेफिकिरी सहन केली जाणार नाही. संबंधित सर्व विभागांनी समन्वयाने काम करून निश्चित कालमर्यादेत परिणाम दिसतील याची दक्षता घ्यावी, असे महापौरांनी स्पष्ट केले.

### महापौरांचे ठोस निर्देश व कार्यवाही

» तात्काळ सर्वेक्षण मोहीम: किवळे व परिसरातील सर्व गृहनिर्माण सोसायट्यांचे ७ दिवसांत सर्वेक्षण करून, सांडपाणी थेट नाल्यात सोडणाऱ्या सोसायट्यांची यादी तयार करावी

» एसटीपी (STP) सक्तीने कार्यान्वित करणे: ज्या सोसायट्यांमध्ये एसटीपी अस्तित्वात असूनही कार्यरत नाही, त्या त्वरित सुरू कराव्यात. नियमांचे पालन न करणाऱ्या सोसायट्यांवर दंडात्मक कारवाई करावी.

» थेट नाल्यांशी जोडणी तोडणे: नाल्यांद्वारे नदीत जाणाऱ्या सर्व बेकायदेशीर जोडण्या शोधून तात्काळ बंद कराव्यात.

» दंड व कायदेशीर कारवाई: पर्यावरण संरक्षण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सोसायट्या/संस्थांवर दंड आकारून, आवश्यकतेनुसार गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया राबवावी.

» सांडपाणी पुनर्वापर अनिवार्य: प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर बाग, फ्लशिंग व इतर उपयोगासाठी करण्याची सक्ती करावी.

» जबाबदारी निश्चित करणे: संबंधित क्षेत्रातील अभियंते व अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून, दुर्लक्ष झाल्यास त्यांच्यावरही प्रशासकीय कारवाई करावी.

» नियमित मॉनिटरिंग यंत्रणा:दर आठवड्याला प्रगती अहवाल सादर करणे बंधनकारक करावे. तसेच तांत्रिक साधनांचा वापर करून सतत देखरेख ठेवावी.

### संपूर्ण शहरात मोहीम राबविणार

» महापौर रवि लांडगे यांनी स्पष्ट केले की, ही कारवाई केवळ किवळे किंवा पवना नदीपुरती मर्यादित न राहता संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरात राबविण्यात येणार आहे. इंद्रायणी, मुळा आणि पवना या तिन्ही नद्यांमध्ये नाल्यांद्वारे सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्याविरुद्ध एकत्रित मोहीम हाती घेण्यात येणार असून, सर्व संबंधित विभागांना याबाबत समन्वयाने काम करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# शत्रुघ्न काटे यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप युवा मोर्चाकडून मोफत विमा नोंदणी अभियान

## वाढदिवस समाजोपयोगी पद्धतीने साजरा; शेकडो नागरिकांनी घेतला योजनांचा लाभ

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपा युवा मोर्चा पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने भव्य 'मोफत विमा नोंदणी अभियान' राबवण्यात आले. शहरातील मुख्य पक्ष कार्यालयात पार पडलेल्या या उपक्रमाला नागरिकांसह पक्ष पदाधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळून समाजोपयोगी कार्य करण्याचा संदेश देत हा उपक्रम आयोजित करण्यात आला. केंद्र सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवणे हा या अभियानामागील मुख्य उद्देश होता.



या शिबिरामध्ये शहरातील शेकडो नागरिक, युवक आणि पक्ष पदाधिकाऱ्यांनी सहभाग नोंदवून लाभ घेतला. तज्ज्ञ प्रतिनिधींमार्फत विमा अर्जांची मोफत नोंदणी तसेच आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली.

या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना अपघाती विमा तसेच विविध सामाजिक सुरक्षा योजनांचे संरक्षण उपलब्ध करून देण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी सांगितले की, "शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांचा नेहमीच कल रचनात्मक आणि समाजोपयोगी उपक्रमांकडे असतो. त्यांच्या वाढदिवसानिमित्त नागरिकांना सुरक्षिततेचे कवच मिळावे, या उद्देशाने युवा मोर्चाने हा उपक्रम हाती घेतला आहे."

# 40 कोटींच्या मालमत्तेचा करार 500 च्या नोटरीवर? महापौरांनी दिले चौकशीचे आदेश

## बाणेर येथील महापालिकेची 40 कोटींची इमारत एका खासगी संस्थेला विनाभाडे दिल्याने खळबळ; नगरसेवक यांनी सभेत मांडला विषय.

**पुणे | प्रतिनिधी**

बाणेर येथील महापालिकेची ४० कोटींची मालमत्ता केवळ ५०० रुपयांच्या नोटरीवर विनाभाडे खासगी संस्थेला दिल्याचा गंभीर आरोप नगरसेवक अमोल बालवडकर यांनी सोमवारी मुख्य सभेत केला. या प्रकरणाची चौकशी करून पुढील सभेत सविस्तर अहवाल देण्याचे आदेश महापौर मंजूषा नागपुरे यांनी दिले आहेत.

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत शहरातील आरोग्यसेवेच्या प्रश्नावर चर्चा झाली. यावेळी नीलेश निकम, अर्चना पाटील, सचिन दोडके आणि वैशाली भालेराव यांनी आरोग्य व्यवस्थेतील त्रुटींवर लक्ष वेधले. या चर्चेत बालवडकर यांनी बाणेर येथील सर्व्हे क्रमांक ३३ मधील पालिकेच्या इमारतीतील रुग्णालयात रुग्णांना कोणतीही सवलत दिली जात नसल्याचा मुद्दा उपस्थित केला.

महात्मा फुले जनआरोग्य योजनेची कागदपत्रे सादर करूनही एका नवजात बालिकेच्या उपचारासाठी संपूर्ण बिल भरण्याची मागणी रुग्णालयाने केल्याचे त्यांनी सांगितले. या रुग्णालयाची इमारत महापालिकेची असून आरोग्य आणि भवन विभागाने केवळ ५०० रुपयांच्या नोटरीवर विनाभाडे दिली आहे.

४० कोटी रुपयांची मालमत्ता वापरूनही त्याचा लाभ नागरिकांना होत नाही. त्यामुळे ही मालमत्ता कोणत्या नियमानुसार रुग्णालया चालविमाऱ्या जेटी फौंडेशनला देण्यात आली याची माहिती द्यावी अशी मागणीही बालवडकर यांनी केली. नगरसेवक अजय खेडेकर यांनी शहरातील अनेक रुग्णालयांमध्ये शहरी गरीब योजना,

महात्मा फुले योजना आणि आयुष्मान भारत योजनेचा लाभ प्रत्यक्षात मिळत नसल्याचा मुद्दा उपस्थित केला. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना आर्थिक फटका बसत असल्याने सर्व रुग्णालयांना शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना द्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

महापालिका, पीपीपी, खाजगी आणि धर्मादाय रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांसाठी आरक्षित खाटांची माहिती नागरिकांना तातडीने मिळावी यासाठी स्वतंत्र मोबाइल ॲप तयार करण्याची मागणी सभेत करण्यात आली. या ॲपमध्ये रुग्णालयाचे नाव, आरक्षित खाटांची संख्या, उपलब्ध खाटा आणि उपचार सुरू असलेल्या रुग्णांची अद्ययावत माहिती असावी, अशी सूचना सदस्यांनी केली.



### आरक्षित खाटांसाठी ॲपची मागणी

» महापालिका, पीपीपी, खाजगी आणि धर्मादाय रुग्णालयांमधील गरीब रुग्णांसाठी आरक्षित खाटांची माहिती नागरिकांना सहज मिळावी यासाठी स्वतंत्र मोबाइल ॲप तयार करण्याची मागणी सभेत झाली. या ॲपमध्ये रुग्णालयाचे नाव, उपलब्ध खाटा, आरक्षित खाटांची संख्या आणि उपचार सुरू असलेल्या रुग्णांची अद्ययावत माहिती असावी, अशी सूचना सदस्यांनी केली. यामुळे रुग्णांना योग्य वेळी उपचार मिळण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### चौकशीचे आदेश

» महापालिकेच्या मुख्य सभेत बाणेर येथील महापालिकेची मालमत्ता खासगी संस्थेला दिल्याचा मुद्दा चांगलाच गाजला. नगरसेवक अमोल बालवडकर यांनी ४० कोटी रुपयांची मालमत्ता केवळ ५०० रुपयांच्या नोटरीवर विनाभाडे देण्यात आल्याचा आरोप केला. या आरोपानंतर सभागृहात मोठी चर्चा रंगली. प्रकरणाची चौकशी करून पुढील सभेत सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश महापौरांनी दिले. या मुद्द्यामुळे महापालिकेच्या मालमत्ता व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### रुग्णांना योजनांचा लाभ नाही?

» बाणेरमधील संबंधित रुग्णालयात गरीब आणि गरजू रुग्णांना शासनाच्या योजनांचा अपेक्षित लाभ मिळत नसल्याची तक्रार सभेत करण्यात आली. महात्मा फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत आणि शहरी गरीब योजना असूनही प्रत्यक्षात रुग्णांकडून संपूर्ण बिल वसूल केले जात असल्याचा आरोप करण्यात आला. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना मोठा आर्थिक फटका बसत असल्याचे सदस्यांनी सांगितले. त्यामुळे सर्व रुग्णालयांमध्ये योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी झाली.

# गुरुवारी संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा बंद; 'या' भागांवर होणार मोठा परिणाम

## शहरातील जलशुद्धीकरण केंद्रे आणि पंपिंग स्टेशनमध्ये तातडीच्या दुरुस्तीचे काम; गुरुवारी मध्यरात्रीपर्यंत पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प राहणार.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील विविध जलशुद्धीकरण केंद्रे, पंपिंग स्टेशनमध्ये तातडीच्या विद्युत, पंपिंग व स्थापत्य दुरुस्ती कामांमुळे येत्या गुरुवारी (दि. २३) रोजी संपूर्ण पुणे शहराचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. बुधवार मध्यरात्री १२ वाजल्यापासून गुरुवार मध्यरात्री १२ वाजेपर्यंत पाणी बंद असणार असल्याची माहिती महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आली आहे.

त्यामध्ये नवीन पर्वती जलशुद्धीकरण केंद्र (५०० एमएलडी), जुने पर्वती केंद्र, वडगाव, वारजे, लष्कर, भामा आसखेड, राजीव गांधी पंपिंग स्टेशन, तसेच खडकवासला जॅकवेलसह अनेक महत्त्वाच्या केंद्रांवर देखभाल व दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार आहे, तर दुसऱ्या दिवशी सकाळी (२४ एप्रिल) रोजी कमी दाबाने व उशिरा पाणीपुरवठा सुरळीत केला जाणार आहे.

नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात आले आहे. महापालिकेकडून मागील गुरुवारी हा पाणीबंद निश्चित करण्यात आला होता. मात्र, त्याच दिवशी शहरातील काही भागातील खासगी टँकरचालकांनी बंद पुकारल्याने हा पाणी बंद रद्द करण्यात आला होता.

पुणे शहरातील विविध जलशुद्धीकरण केंद्रे, पंपिंग स्टेशन आणि महत्त्वाच्या जलवाहिन्यांवर तातडीची विद्युत, पंपिंग व स्थापत्य दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार असल्याने येत्या गुरुवारी (दि. २३) संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे.



### पाणीबंदपूर्वी करा तयारी

» पुणे शहराचा पाणीपुरवठा २३ एप्रिल रोजी संपूर्ण दिवस बंद राहणार असल्याने नागरिकांनी आधीच आवश्यक पाणीसाठा करून ठेवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. बुधवार मध्यरात्रीपासून गुरुवार मध्यरात्रीपर्यंत पाणीपुरवठा बंद राहील. विविध जलशुद्धीकरण केंद्रे, पंपिंग स्टेशन आणि जॅकवेल येथे दुरुस्ती व देखभाल कामे केली जाणार आहेत. त्यामुळे घरगुती वापरासाठी, पिण्यासाठी आणि इतर गरजांसाठी पुरेसे पाणी साठवून ठेवावे. तसेच २४ एप्रिल रोजी सकाळी पाणी कमी दाबाने आणि उशिरा येण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी संयम बाळगून प्रशासनाला सहकार्य करावे.

# दादांचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी रणांगणात उतरले; बारामतीत सुनेत्रा पवार भावूक

## सांगता सभेत कंठ दाटला; बारामतीकरांच्या पाठिंब्यावर विश्वास व्यक्त करत भावनिक साद

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीकरता आजचा शेवटचा दिवस आहे. बारामतीच्या ..प्रांगणात पोटनिवडणुकीसाठी सांगता सभा पार पडत आहे. या सभेकरता राज्यभरातील सत्ताधारी आणि विरोधातील अनेक नेते उपस्थित आहेत. यावेळी भाषण करताना सुनेत्रा पवारांचा कंठ दाटून आला. पण भावनेच्या भरात अश्रू डोळ्यांतून ओघळण्याआधीच त्यांनी त्यांच्या भावना आवरल्या आणि भाषण सुरू ठेवलं.

सुनेत्रा पवार म्हणाल्या, "आज मी इथे उभी आहे, महायुतीचा उमेदवार म्हणून.. फक्त उमेदवार म्हणूनच नाही तर अपूर्ण राहिलेल्या स्वप्नांची जबाबदारी घेऊन. दादा गेले पण त्यांची स्वप्न अजूनही जिवंत आहे. त्यांची स्वप्न पूर्ण करण्याकरता मी आज रणांगणात उतरली आहे. ही लढाई सोपी नाही. पण मी एकटीही नाही. कारण मला विश्वास आहे, माझ्या मागे संपूर्ण बारामतीकरांची ताकद उभी आहे. ही माती माझी आहे. तुम्ही माणसं माझी आहात. तुमचा विकास हाच दादांप्रमाणे माझाही ध्यास आहे. आज मी तुमच्याकडे मत मागायला येथे उभे राहिले नाही. मी तुमच्याबरोबर नातं टिकवायला उभे आहे. माझ्यावर विश्वास ठेवा, मी तुमचा विश्वास कधीच कमी होऊ देणार नाही."

"खरं सांगायचं तर माझं दुख मोठं आहे", असं म्हणताना सुनेत्रा पवारांचा कंठ दाटून आला. अश्रू अनावर झाले. पण अश्रूंना सावरत त्या पुढे म्हणाल्या, "माझं तर सर्वस्व हरवलंय, पण लाखोंचा पोशिंदा गमावलेल्या आणि आशेने माझ्याकडे पाहणाऱ्या या पोरक्या जनतेकडे पाहिल्यानंतर दादांचं स्वप्न, त्यांच्या कर्तव्याची जाणीव आणि त्यांच्या पश्चात माझ्यावर आलेली जबाबदारी या साऱ्यांच्या बळावर हे शिवधनुष्य उचलून मी पुढे चालत राहण्याचा निर्धार केला आहे. दादांची जागा कोणीच घेऊ शकत नाही. पण त्यांच्या विचारांचा, कार्याचा वारसा पुढेझे नेण्याचा ताकदीने प्रयत्न करेन", असा निर्धारही त्यांनी बोलून दाखवला.

"दु:खाला कवटाळून न बसता मी दादांचं कार्य पुढे नेण्याकरता त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून उभी आहे. माझ्याबरोबर कोणी असो वा नसो, जोपर्यंत तुम्ही बारामतीकर जनता माझ्या पाठीशी आहात, तोपर्यंत मी खचणार नाही, मागे हटणार नाही. मी एका संघर्षयोद्धाची सहचारिणी आहे. येसूबाई जशा लढल्या, अहिल्याबाईंनी जसा कारभार चालवला आणि आपल्या लोकांना न्याय दिला, त्या निष्ठेने मी तुमची सेवा करेन. शिव, शाहू, फुले, आंबेडकरांची विचारधारा ही महाराष्ट्राची ओळख आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचीही तीच विचारधारा राहिलेली आहे. यापुढेही ती तशीच राहील याची मी खात्री देते. बारामती माझी ताकद आहे. तुम्ही बारामतीकर माझ्या जीवाभावाच्या कुटुंबातील माणसं आहात, हीच भावना उराशी बाळगून सतत काम करत राहणार आहे", असा विश्वासही त्यांनी बारामतीकरांना दिला.



### भावनिक भाषणाने वातावरण भारावले

» बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या सांगता सभेत सुनेत्रा पवार यांनी भावनिक भाषण करत उपस्थितांना साद घातली. भाषणादरम्यान दादांच्या आठवणींनी त्यांचा कंठ दाटून आला. त्यांनी अपूर्ण स्वप्ने पूर्ण करण्याची जबाबदारी स्वीकारल्याचे सांगितले. सभास्थळी उपस्थित कार्यकर्ते आणि नागरिकांनी टाळ्यांच्या गजरात त्यांना पाठिंबा दिला. या भाषणामुळे सभेतील वातावरण भारावून गेले. शेवटच्या दिवशी झालेल्या या सभेने निवडणुकीत भावनिक रंग चढल्याचे चित्र दिसून आले.

### 'बारामती माझी ताकद'

» सुनेत्रा पवार यांनी बारामतीकरांवर पूर्ण विश्वास व्यक्त केला. "ही माती माझी आहे, तुम्ही माणसं माझी आहात," असे सांगत त्यांनी मतदारांशी भावनिक नातं व्यक्त केले. बारामतीचा विकास हा आपलाही ध्यास असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मत मागण्यासाठी नव्हे, तर नातं टिकवण्यासाठी आपण उभ्या असल्याचेही त्यांनी सांगितले. बारामतीकरांचा पाठिंबा मिळाला तर कोणतीही लढाई कठीण नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### वारसा पुढे नेण्याचा निर्धार

» दादांची जागा कोणी घेऊ शकत नाही, मात्र त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा पुढे नेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सुनेत्रा पवार म्हणाल्या. दु:खात न बसता सेवा आणि विकासाच्या मार्गाने पुढे जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारधारेप्रती निष्ठा व्यक्त करत जनतेच्या सेवेसाठी कटिबद्ध राहण्याचा शब्द दिला. या निर्धारपूर्ण भूमिकेमुळे समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# सायकल ट्रॅकमुळे रस्ते सुधारले; पण पुरंदरमध्ये वाढला अपघातांचा धोका

## स्पीडब्रेकर हटवल्याने नागरिक धास्तावले; शाळकरी मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर

**पुणे | प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय सायकल ट्रॅकच्या अनुषंगाने पुरंदर तालुक्यातील अनेक रस्त्यांचा कायापालट करण्यात आला आहे. मात्र, याच कामांमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. चांबळी-कोडीत-नारायणपूर हा महत्त्वाचा मार्ग सध्या अक्षरशः मृत्यूला आमंत्रण देत असल्याची भीती स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहेत.

सायकल ट्रॅकच्या कामादरम्यान अपघात टाळण्यासाठी या मार्गावर स्पीडबेकर बसविण्यात आले होते. मात्र, रस्त्याचे डांबरीकरण व इतर कामे करताना सर्व स्पीडबेकर काढून टाकण्यात आले. परिणामी, वाहनचालक सुसाट वेगाने गाड्या चालवत असून, अपघातांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

हा मार्ग तीर्थक्षेत्राशी जोडलेला असल्याने दररोज हजारो भाविक या रस्त्याचा वापर करतात. त्याचबरोबर या मार्गावर जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी आणि इतर शैक्षणिक संस्था असल्याने शाळकरी मुलांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे सुरक्षेचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे.

या मार्गावरील अपघातांची शक्यता लक्षात घेता महत्त्वाच्या ठिकाणी स्पीड बेकर बसविणे, वाहतूक नियंत्रणासाठी सूचना फलक लावणे आणि नियमित गस्त वाढविणे यांसारख्या उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.



### तातडीच्या उपाययोजनांची मागणी

» चांबळी-कोडीत-नारायणपूर मार्गावर वाढता अपघाताचा धोका लक्षात घेता ग्रामस्थांनी तातडीच्या उपाययोजनांची मागणी केली आहे. महत्त्वाच्या ठिकाणी स्पीडबेकर पुन्हा बसविणे, इशारा फलक लावणे, वाहतूक पोलिसांची नियमित गस्त वाढविणे आणि शाळा परिसरात वेगमर्यादा लागू करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. हा मार्ग तीर्थक्षेत्राशी जोडलेला असल्याने दररोज हजारो भाविकांची वर्दळ असते. तसेच शाळकरी मुले मोठ्या संख्येने ये-जा करतात. त्यामुळे कोणतीही मोठी दुर्घटना होण्यापूर्वी प्रशासनाने त्वरित पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी होत आहे.